क्रिकेट म्हणजे काय असत?
क्रिकेटवेड्यांच प्रेम असत
चेंडूफळी, चौकार, षटकार
सामवल गुपीत असते

क्रिकेट, क्रिकेट,क्रिकेट आज जगभरात क्रिकेटचा Fever वाढलाय. सार जग क्रिकेटमय झालाय. यामध्ये २००७ चा World Cup म्हणजे क्रिकेट रसीकांची पंढरीच म्हणायला हवी. आजकाल क्रिकेटच मैदान हे मंदीर आणि क्रिकेटर म्हणजे देव झालेय. अगदी गल्ली ते दिल्ली सगळीकडे क्रिकेट म्हणजे जीवन झालय. अगदी लहान लहान मुले सुध्दा स्वत:ला धोनी आणि सचिन म्हणू लागले आहेत. क्रिकेटर प्रमाणे तरूण मुले राहू लागली आहेत. देशभक्तीच्या भावनेने पाहिल्यास भारतीयांचा क्रिकेट प्रेम खरोखर अतुलनीय आहे.

क्रिकेटच्या बाबतीत समळ्यांची मतभिन्नता असू शकते. करोडो भारतीयांची मत घेतल्यास त्यामधुन नक्कीच आश्चर्यकारक निष्कर्ष निघू शकेल. माझ्या मताप्रमाणे क्रिकेटला अधिक महत्व दिल्यामुळे हा खेळ न राहता युद्ध झालय. आणि या युद्धात बळी जातोय तो बिचाऱ्या क्रिकेटवेड्या रसिकांचा खेळणारे खेळतात. हरणारे हरतात, जिंकणारे जिंकतात परंतु तासनतास उन्हातान्हात, टिव्हि समोर, खाणे-पिणे विसरून क्रिकेटला आपला संपूर्ण वेळ देणारा प्रेक्षक मात्र तिळ तिळ तुटण्यापलीकडे काहीही करू शकत नाहीत.

संघात कपिल देव सारखे दिग्गज खेळाडू असताना, सुनील गावस्करांसारखे महान फलंदाज असताना कुठलाही गाजावाजा न करता भारताने World Cup आपल्याकडे खेचून आणला. परंतू आता मोठी व्हात होऊन गेलेला भारतीय संघ पहिल्या आठ मध्येही आपले स्थान टिकवून ठेवू शकला नाही. त्यामुळे प्रत्येक भारतीय निराशेच्या गर्तेत गेला. जबाबदारी कुणाची, खेळाडूंची, संघाची, कप्तानाची, कोचची, कि या सर्वांना प्रसिद्धी देणाऱ्या प्रसार माध्यमाची आपण भारतीय चर्चा जास्त करतो, कृती कमी करतो त्याचाच हा परिणाम. खेळाडूंना नको तीतके महत्व दिल्याचा हा परिणाम खेळात हा परिणाम खेळात सुधारणा होण्याएवजी खेळाडूंच्या राहणीमानात सुधारणा होते आहे.

प्रेक्षक ही खेळाला खिलाडू वृत्तीने न पाहता युध्दाप्रमाणे बघू लागलाय. त्यामुळे खेळाला खेळपण न राहता मैदानाला रणांगणच स्वरूप येऊ घातलय. लहान मुलांचे शाळेपेक्षा त्यांना मैदानाकडे घेऊन चाललाय, खेळ खेळणे वाईट नाही परंतू क्रिकेट हाच एकमेव खेळ असू शकतो का? असे कितीतरी खेळ आहेत जी उद्याची पिढी या खेळांचा वारसा जपू शकते. तरूणांनी फक्त ग्लॅमर, पैसा, प्रसिध्दि या दृष्टीने क्रिकेटर व्हायच ठरवल तर भारतीय संघ केवळ शो पुरता राहिल. हे नक्की ....
विश्वचषक म्हणजे क्रिकेटचा सर्वोच्च बिंदू नव्हे, त्यामुळे मागचे सगळे सोडून आपल्या खेळाडूंच्या विक्रमाचे महत्व आपण कमी करतो. प्रसिद्धी माध्यमाचे प्रतिनीधी खेळापेक्षा Dressing room मध्ये काय सुरू आहे? याकडे लक्ष देऊ लागले आहेत.

आज तेंडूलकर सारख्या महान खेळाडूची संघाला गरज आहे. तेव्हा असे सचिन होण्यासाठी तेवढे परिश्रम तेवढी परिश्रम तेवढी जिद्द मुलांच्या अंगी आपण आणली पाहिजे. केवळ क्रिकेटर नाही तर इतरही इतरही खेळ तू खेळू शकतोस हे मुलांना पटवून दिले पाहिजे. खेळाकडे जर खेळाच्या दृष्टीनेच जर बघितले तर हा खेळ सर्वांना आनंद होईल. क्रिकेटर जर मैदानात Hero म्हणून नाही. तर क्रिकेटर म्हणून उतरला तर खेळात नक्कीच आत्मियता येईल. प्रसिध्दीमाध्यमांनी Dressing room पेक्षा मैदानात नजर वळवली तर त्याचे डावपेच समजू शकतील.आणि हा नाही तरी येणारा <u>२०१०</u> चा world-Cup नक्कीच भारतीयांचा होईल.

**शुभदा गुरव**